# राज्य मराठी विकास संस्था

**(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)**

**एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,**

**धोबीतलाव, मुंबई - ४००००१**

**इ-टपाल :** rmvsmumbai@gmail.com ; rmvs_mumbai@yahoo.com

---

**ई - निविदा सुचना क्र. १/२०२२-२३**

खालील कामासाठी राज्य मराठी विकास संस्था एंटरटेनमेंट आणि मीडिया क्षेत्रातील आस्थापने कडून मोहोरबंद निविदा मागवित आहे.

| अ. क्र | कामाचा तपशील | कामाची अंदाजित रक्कम | निविदेची किंमत | बयाणा रक्कम | विधिग्राह्य कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | अभिजात मराठी जनअभियान - टप्पा दुसरा कार्यान्वित करणे | रु. ७१,००,०००/- | १०,०००/- | १,००,०००/- | ४० दिवस |

निविदा सूचना व निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.inया संकेतस्थळावर **दि. ६.४.२०२२ ते दि. २१.४.२०२२ दुपारी ३.०० वाजेपर्यंत** उपलब्ध आहेत. निविदा इच्छुकांसाठी सविस्तर माहिती संस्थेच्या https://rmvs.marathi.gov.in या संकेतस्थळावर अवलोकनासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदेच्या ऑनलाईन फॉर्मची किंमत रु. १०,०००/-तसेच इसारा रक्कम रु. १,००,०००/- इतकी राहील.

निविदेतील अटी व शर्तींमध्ये नमूद केल्याप्रमाणे ई-निविदा योग्य त्या कागदपत्रांची पुर्तता करून व व्यवस्थित भरून **दि. २१.४.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत** अथवा त्याअगोदर सादर करावी. सदर निविदा **दि. २२.०४.२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता** उपस्थित निविदाकारांच्या समक्ष अथवा त्यांच्या प्रतिनिधी समक्ष राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्यालयात उघडण्यात येतील. अधिक माहितीसाठी वरील कार्यालयात संपर्क करावा.

प्राप्त झालेल्या निविदांपैकी कोणतीही एक निविदा स्वीकारण्याचा अथवा कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा संपूर्ण अधिकार, संचालक, राज्य मराठी विकास संस्था हे स्वतःजवळ राखून ठेवीत आहेत.

सही /-

संचालक

राज्य मराठी विकास संस्था

राज्य मराठी विकास संस्था

३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई - ४००००१

(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)

****************************************************************************************************

*********

## **“जन अभियान भाग - २”**

## <u>निविदा प्रपत्र</u>

कामाचे नावः- अभिजात मराठी जनअभियान - टप्पा दुसरा कार्यान्वित करणे

# राज्य मराठी विकास संस्था

३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई - ४००००१

(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)

****************************************************************************************************

**“जन अभियान भाग - २”**

कामाचे नावः- अभिजात मराठी जनअभियान -टप्पा दुसरा कार्यान्वित करणे.

**१.० प्रस्तावनाः-** महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाअंतर्गत असलेल्या राज्य मराठी विकास संस्थेतर्फे **“जन अभियान दुसरा टप्पा”** प्रस्तावित आहे. सदर कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन करण्याकरिता समारंभ आयोजन संस्था, निर्मिती संस्था, समाज माध्यमी संस्था आणि जाहिरात श्रेत्रातील संस्थांपैकी एका नामवंत संस्थेची नेमणूक करणे प्रस्तावित आहे. सदर कामाची व्याप्ती (Scope of work) सोबत **परिशिष्ट अ** मध्ये जोडलेले आहे. तसेच निविदेच्या अटी व शर्ती **परिशिष्ट ब** मध्ये जोडल्या आहेत.

**२.० निविदा विक्रीः-** निविदा सूचना व निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या https:// mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दि. ६.४.२०२२ ते दि. २१.४.२०२२ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत** उपलब्ध आहेत. सदर निविदेची रक्कम रु. १०,०००/- व EMD रक्कम रु. १,००,०००/- (अक्षरी एक लक्ष रुपये फक्त) ऑनलाईन पद्धतीने net banking द्वारे स्वीकारण्यात येईल. https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदाधारकांना इ-निविदा प्रणाली संबंधीत माहितीसाठी २४x७ टोलफ्री नं. **0120-4001 002 / 005** ई-मेल **eproc@nic.in** या वर संपर्क साधावा.

**३.० निविदा सदर करणेः-** निविदेतील अटी व शर्तीमध्ये नमूद योग्य त्या कागदपत्राची पूर्तता करून ऑनलाईन पद्धतीने https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर **दि. २१.४.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत** अथवा त्याअगोदर सादर करावी. त्यानंतर आलेल्या निविदेचा स्विकार केला जाणार नाही.

**४.० निविदा उघडणेः- दि. २२.४.२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता** उपस्थित निविदाकारांच्या समक्ष अथवा त्यांच्या प्रतिनिधीसमक्ष राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्यालयात इ-निविदा प्रणालीद्वारे उघडण्यात येईल.

**५.० कामाची कालावधीः-** ४० दिवस

**६.० निविदा भरणेः-** निविदाकाराने निविदा प्रपत्राच्या प्रत्येक पृष्ठावर सही करून ऑनलाईन इ-निविदा प्रणालीद्वारे ती सादर करावी. निविदाकाराने त्यांचा निविदा दर हा सोबत जोडलेल्या परिशिष्ट क मध्ये दिलेल्या विहित

नमुन्यात भरून ऑनलाईन इ-निविदा प्रणालीद्वारे सादर करावा. निविदा दर हा अंक व अक्षर अश्या दोन्ही पद्धतीने भरावा. तसेच निविदाकाराने अनुभवाचे प्रमाणपत्र व इतर निवेदितील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सोबत सादर करावीत. निविदाकाराने ऑनलाईन इ-निविदा प्रणालीद्वारे दोन लिफाफ्यामध्ये कागदपत्रे सादर करावीत. लिफाफा १ मध्ये निविदाकाराचा अनुभव, इसारा (EMD) रक्कम रु.१,००,०००/- भरल्याची पावती, परिशिष्ट ब मधील इतर कागदपत्रे सादर करावीत. लिफाफा २ मध्ये फक्त निविदा दर सादर करावा.

**७.० निविदा स्वीकारणे:-** निवेदितेतील अटी व शर्तीनुसार निविदाकाराची पात्रता तपासून पात्र निविदाकाराचे या क्षेत्रातील अनुभव सामर्थ्य. तसेच पूर्वपिठीक आणि अर्थिक देकारानुसार यशस्वी निविदाकार ठरविण्यात येईल. तसेच प्राप्त झालेल्या निविदांमध्ये कोणतीही एक निविदा स्वीकारण्याचा अथवा कोणतीही एका अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा संपूर्ण अधिकार संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई हे स्वतःजवळ राखून ठेवीत आहेत.  अधिक माहितीसाठी वरील कार्यालयात कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक (०२२) २२६३१३२५ किंवा २२६५३९६६ संपर्क साधावा.

**८.० निविदा मूल्यांकन (Bid Evaluation):-** निविदा मूल्यांकन करताना निविदाकाराची पात्रता, यापूर्वी केलेल्या कामाचा अनुभव, काम पूर्ण करण्याची क्षमता आणि सदर निविदेतील कामाच्या व्याप्तीप्रमाणे आवश्यक असणाऱ्या अनुभवावरून तांत्रिक गुणांकन केले जाईल. यासाठी तांत्रिक बाबीसाठी ७०% आणि आर्थिक बाबीसाठी ३०% असे गुणांकन विचारात घेतले जाईल. तांत्रिक (Technical) व आर्थिक (Financial) गुणांची एकत्रित बेरीज करून जास्त गुण असणारा निविदाकार हा यशस्वी निविदाकार असेल.

एकत्रित गुण (Combined Score) = (०.७० * तांत्रिक गुण) + (०.३० * अर्थिक गुण)

आर्थिक गुण (Financial Score) = १०० (Lowest Price / Price of proposal under consideration)

# राज्य मराठी विकास संस्था

३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४००००१

(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)

---

## परिशिष्ट अ

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>कामाचा तपशील</th><th>कामाची अंदाजित रक्कम (करांसहित)</th></tr>
<tr><td>१.</td><td>नाट्यगृहात जनअभियान-<br>कामाचे स्वरूप -<ul><li>मुंबई, ठाणे, नवी मुंबई, डोंबिवली, कल्याण, पुणे व पिंपरी चिंचवड येथील १० अशी नाट्यगृहे जिथे सातत्याने नाट्यप्रयोग होतात अश्या ठिकाणी याचिका कक्ष स्थापित करणे</li><li>तिकीट खिडकीवर मा. महामहिम राष्ट्रपती यांना पाठवावयाच्या मजकुराचे पोस्टकार्ड उपलब्ध करून देणे</li><li>निर्मात्यांसोबत समन्वय साधून प्रयोगाच्या आधी व मध्यंतरात सचिन खेडेकर ह्यांच्या आवाजातील ध्वनिमुद्रित आवाहन रंगमंदिरात करणे</li><li>कार्डवाटप, संकलन ह्यासाठी प्रत्येक ठिकाणी महिनाभर मनुष्यबळ उपलब्ध करणे. पोस्टात ती काड्र्स नेऊन फ्रँकिंग करून मा. महामहिम राष्ट्रपतींच्या कार्यालयाकडे पाठविणे.</li></ul>कालावधी - ३० एप्रिल ते १० जून २०२२<br>उपयुक्तता – ह्याद्वारे ३०० प्रयोगांच्या प्रत्येकी अंदाजे ५०० प्रेक्षकांपर्यंत संदेश निश्चित आणि प्रभावी पद्धतीने पोहोचेल (एकूण १, ५०,०००) व त्यातून बहुसंख्य प्रेक्षक याचिका दाखल करतील असा प्रयत्न असावा.</td><td>रु. २९,८५,४००/-</td></tr>
<tr><td>२.</td><td>“शांतता मराठीचे कोर्ट चालू आहे” ह्या लघुपटाचे हिंदी भाषेत रूपांतर करणे -<br>कामाचे स्वरूप -<ul><li>मराठी संहितेचे हिंदी भाषांतर करणे</li><li>विषयातील तज्ज्ञ मंडळींकडून ते तपासून घेणे</li><li>प्रथितयश कलाकारांकडून हिंदी डबिंग करून घेणे.</li><li>मूळ लघुपटाच्या दिग्दर्शकाच्या देखरेखीखाली सदर काम करणे अनिवार्य आहे.</li></ul></td><td>रु. ३,५०,४६०/-</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | कालावधी - अमर्यादित<br>उपयुक्तता - लक्षावधी अमराठी प्रेक्षकांपर्यंत हे जनअभियान तसेच हा विषय पोहोचेल ह्यायोगें इतर भाषक भारतीय प्रेक्षकांचे सकारात्मक जनमत तयार होईल. | |
| ३. | **“शांतता मराठीचे कोर्ट चालू आहे” ह्या लघुपटाचे इंग्रजी सब टायटल्ससह रूपांतर करणे**<br>कामाचे स्वरूप-<br>• मराठी संहितेचे इंग्रजी भाषांतर करणे<br>• विषयातील तज्ज्ञ मंडळींकडून ते तपासून घेणे<br>• प्रथितयश संस्थेकडून सबतायतलिंग करून घेणे.<br>• मूळ लघुपटाच्या दिग्दर्शकाच्या देखरेखीखाली सदर काम करणे अनिवार्य आहे.<br><br>कालावधी - अमर्यादित<br><br>उपयुक्तता – लक्षावधी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अमराठी प्रेक्षकांपर्यंत हे जनअभियान पोहचेल ह्यायोगे इतर भाषक प्रेक्षकांचे सकारात्मक जनमत तयार होईल हे राजधानी दिल्लीतही उपयोगाचे होईल. | रु. २,३३,६४०/- |
| ४. | **“शांतता मराठीचे कोर्ट चालू आहे” महाविद्यालय पातळीवर पोहोचवणे**<br>कामाचे स्वरूप-<br>• महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यातील १०० महाविद्यालयांची निवड केली जाईल.<br>• ह्यांसोबत समन्वय साधून कार्यक्रम निश्चित केले जातील.<br>• लघुपट सादर केला जाईल. त्यानंतर चर्चा घडेल.<br>• कार्यक्रमाचे आकर्षण म्हणून व नंतरच्या चर्चेसाठी प्रथितयश कलाकारांची नियुक्ती केली जाईल.<br>• लघुपट दाखविण्यासाठी यंनत्रसामुग्री व तंत्रज्ञ उपलब्ध करून देण्यात येईल<br>कालावधी - ३० एप्रिल ते १० जून २०२२<br><br>उपयुक्तता – ३६ जिल्ह्यातील १०० महाविद्यालयातून १६ ते २३ ह्या वयोगटातील लाखो (अंदाजे १०, ००,०००) महाविद्यालयीन व उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांपर्यंत अभियान पोहोचणे अभिप्रेत आहे.<br>अभिजात मराठीबद्दल  रुची आणि  ज्ञान प्राप्त होवून तरुण पिढी मराठी भाषेकरिता सजग आणि प्रेरित होणे अभिप्रेत आहे. | रु. १८,१७,२००/- |
| ५. | **भ्रमणध्वनी संदेशाद्वारे जनतेपर्यंत पोहोचणे**<br>कामाचे स्वरूप-<br>• मोठ्या प्रमाणात SMS द्वारा आणि whatsapp द्वारा १०,००,०००  संदेश | रु. ३,२४,५००/- |

| | | |
|---|---|---|
| | पाठविणे<br>• हे काम करणाऱ्या टेलिकॉम कंपन्यांशी समन्वय<br>• संदेशांची निर्मिती करणे<br>• २० लाख ग्राहकांपर्यंत पोहोचणे<br><br>कालावधी - ३० एप्रिल ते १० जून २०२२<br><br>उपयुक्तता – अभिजात मराठी गीताचा मोठ्या पडद्यावरून दीर्घ काळ स्मरणात राहील असा प्रभावी प्रचार आणि प्रसार लाखो प्रेक्षकांपर्यंत अभियान प्रभावीपणे पोहोचवून मोठे जनमत तयार करणे अभिप्रेत आहे. | |
| ६. | **अभिजात मराठी भाषेबद्दल लेख**<br>कामाचे स्वरूप-<br>• प्रथितयश व सिद्धहस्त लेखकांची फळी निर्माण करणे<br>• एकूण १०० लेख लिहून घेणे<br>• ते विविध वृत्तपत्रे, मासिके, संकेतस्थळे ह्यांवरून प्रसिद्ध करणे<br><br>उपयुक्तता- कोट्यवधी वाचकांपर्यंत तपशीलात प्रचार आणि प्रसार करून वाचकांपर्यंत अभिजात मराठीचे सखोल विवेचन पोहोचवून मोठे आणि सुबुद्ध जनमत तयार करणे अभिप्रेत आहे. | रु. २,९२,०५०/- |
| ७. | **वृत्तवाहिन्यांवरील कार्यक्रमात अंतर्भाव**<br>कामाचे स्वरूप-<br>• विविध वृत्तवाहिन्यांवर कार्यक्रम - मुलाखती, स्पेशल फीचर्स<br>• चर्चा आयोजित करणे आणि त्यात मान्यवरांना निमंत्रित करणे<br><br>कालावधी- ३० एप्रिल ते १० जून २०२२<br><br>उपयुक्तता – कोट्यवधी प्रेक्षकांपर्यंत प्रचार आणि प्रसार,<br>चर्चांद्वारा अभिजात मराठीबाबत सखोल चर्चा आणि विचार मंथन पोहोचवून मोठे आणि सुबुद्ध जनमत तयार करणे अभिप्रेत आहे. | रु. ४,७२,०००/- |
| ८. | **FM रेडिओ वरून जाहिरात**<br>कामाचे स्वरूप -<br>• विविध FM स्टेशनवरून अभिजात मराठीचे स्पॉट्स चालविणे<br>कालावधी - ३० एप्रिल ते १० जून २०२२<br>उपयुक्तता - कोट्यवधी प्रेक्षकांपर्यंत प्रचार आणि प्रसार करून जनमत तयार होण्यास मदत होणे अभिप्रेत आहे. | रु. ३,५४,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ९. | **दिल्लीत पाठपुरावा**<br>कामाचे स्वरूप-<br>• दिल्लीतल्या वृत्तपत्रांसोबत आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया सोबत PR ॲक्टिव्हिटी. ज्ञानेश्वर मुळे आणि इतर मराठी विचारवंत, अधिकारी यांच्या भेटीगाठी व संपर्क.<br>कालावधी- ३० एप्रिल ते १० जून २०२२<br>उपयुक्तता- दिल्लीतील राजकारणी, मुत्सद्दी आणि विचारवंत लोकांमध्ये अभियानाबद्दल माहिती पोहोचवणे तसेच अभिजात दर्जा मिळावा ह्याचे संबंधित अधिकारी आणि मंत्री ह्यांच्याकडे प्रभावी प्रतिपादन आणि पुनरुच्चार होणे अभिप्रेत आहे. | रु. २,९५,०००/- |

**महत्वाची सुचना – वरील कामांच्या पूर्णत्वानंतर संबंधित निविदाधारक व्यक्ती/संस्था यांनी निविदेप्रमाणे काम पूर्ण झाल्याचे, प्रस्तावित जनसंख्येपर्यंत अभियान पोहोचलेबाबतचे लेखी आणि ठोस पुरावे त्यांच्या देयकांसोबत सादर करणे बंधनकारक राहील.**

# राज्य मराठी विकास संस्था

**३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४००००१**

**(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)**

---

"अभिजात मराठी जनाभियान - दुसरा टप्पा"

**निविदा धारकाची वैयत्तिक माहिती**

| अ.क्र. | पात्रता निकष | हो / नाही |
|---|---|---|
| १. | संस्थेचे पूर्ण नाव आणि पत्ता दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक / ई -मेल / फॅक्स क्रमांक | |
| २. | संस्थेचे महाराष्ट्रामध्ये कार्यालय असणे आवश्यक आहे. त्याचा पुरावा सादर करणे. | |
| ३. | संबंधित कायद्यांतर्गत नोंदणीकृत आणि किमान गेल्या वीस वर्षांपासून अस्तित्वात असलेली कोणतीही व्यक्ती किंवा संस्था किंवा मालकी किंवा भागीदारी किंवा एलएलपी या प्रक्रियेत सहभागी होण्यास पात्र आहेत. | |
| ४. | निविदा फॉर्मची किंमत रु. १०,०००/- भरल्याची पावती. | |
| ५. | बयाणा रक्कम रु. १,००,०००/- भरल्याची पावती. | |
| ६. | पॅन क्रमांक | |
| ७. | सर्टिफिकेट ऑफ इनकॉर्पोरेशन / शॉप ऍक्ट | |
| ८. | वस्तू व सेवा कर प्रमाणपत्र | |
| ९. | मागील तीन वर्षांचे भरलेले आयकर चलन - २०१८-१९, २०१९-२० आणि २०२०-२१ | |
| १० | संस्थेची वार्षिक आर्थिक उलाढाल किमान दोन कोटी किंवा त्यापेक्षा जास्त असावी. | |
| ११. | सनदी लेखा परीक्षकाने प्रमाणित केलेले मागील ३ आर्थिक वर्षांचे सनदी लेखे (Audited statement of accounts for the last 3 financial years) | |
| १२. | भ्रष्ट किंवा फसव्या व्यक्तींसाठी अपात्रतेसाठी स्व-घोषणा. | |
| | | |

| परिशिष्ट ब | | |
|---|---|---|
| अ.क्र. | निविदा स्वीकारण्यासाठीच्या नियम व शर्ती | हो / नाही |
| १. | महाराष्ट्र शासनाकरिता समारंभ , लघुपट , प्रदर्शन , जन अभियान इत्यादी आयोजन करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. (किमान रु. २५ लक्ष किंवा त्याहून जास्त रकमेच्या कामाचा पूर्वानुभव) | |
| २. | नाटक, लघुपट, चित्रपट, जाहिराती इतर सांस्कृतिक किंवा मनोरंजन कार्येक्रम करण्याचा किमान २० वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. | |
| ३. | महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात तसेच तालुका स्तरावर सेमिनार, चर्चासत्र आयोजित करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. | |
| ४. | लघुपट, चित्रपटनिर्मितीचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br>(राज्य, राष्ट्रीय पुरस्कार व अधिक अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य) | |
| ५. | राज्य पातळीवरील वर्तमानपत्रांमध्ये कार्यक्रमांच्या बातम्या, लेख, ब्लॉग्स, इत्यादी प्रकाशित करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. | |
| ६. | महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात जाहिरातीच्या माध्यमातून प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांचा वापर (उदा . होर्डिंग्स , बॅनर )करून लोकांपर्यंत माहिती पोहोचविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. | |
| ७. | विविध मराठी वृत्तवाहिन्यांवर मुलाखती, स्पेशल फीचर्स, चर्चासत्र आयोजित करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. | |
| ८. | मराठी साहित्यांवर आधारित मराठी वाहिन्यांवर कार्यक्रम करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br>(अधिक अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य) | |
| ९. | FM रेडिओ वरून जाहिराती करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. | |
| १०. | चित्रपट,लघुपटाचे इंग्रजी भाषेत सब - टायटलींग करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. | |
| ११. | कार्यक्रमाचा प्रचार व प्रसार मोबाईल संदेश /व्हाट्सअँप मेसेज च्या द्वारे करण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. | |

| | | |
|---|---|---|
| १२. | गेल्या १० वर्षात केलेलेल्या कार्यक्रमांची यादी आणि त्याचे संक्षिप्त वर्णन सादर करणे. कामाच्या पूर्णत्वांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.<br>कागदोपत्री पुराव्यासह, निमंत्रण पत्रिका, जाहिराती, होर्डिंग्ज, पेपर कटिंग्ज इ. पुरावे म्हणून स्वीकारले जातील. स्व-घोषणा अनुभव म्हणून स्वीकारली जाणार नाही.<br>As per Annexure - II | |
| १३. | वरील सर्व कामांचे कार्यादेश/ पूर्णत्व प्रमाणपत्र / देयके सादर करणे गरजेचे आहे. | |

Annexure - II

| अ. क्र. | ज्या आस्थापनेसाठी काम केले त्यांचे नाव | कामाचे स्वपरुप | काम केलेल्या तपशीलांचे वर्ष | रक्कम (रुपयांत) |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |
| ८. | | | | |

(खास प्रकल्पाबाबत उल्लेख करावयाचा असल्यास स्पष्टता नमूद करावी.)

संचालक,<br>
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

# राज्य मराठी विकास संस्था

**३, महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४००००१**

**(महाराष्ट्र शासन पुरस्कृत)**

---

**"अभिजात मराठी जनाभियान - दुसरा टप्पा"**

**परिशिष्ट क**

**अभिजात मराठी जनअभियान - टप्पा दुसरा कार्यान्वित करणे** यासाठी निविदा दराचा नमुना.

मी खालीलप्रमाणे आमचे दर सर्व करांसहित कळवीत आहे. निविदा सूचनेतील सर्व अटी आम्हाला मान्य असून सदर निविदा आम्ही परिशिष्ट क्रमांक (ब) अटी व शर्तीनूसार सादर करत आहोत.

| अ.क्र. | विषय | कामाचा तपशील | सर्व प्रकारच्या अनुज्ञेय करांसहित |
|---|---|---|---|
| **१.** | **"अभिजात मराठी जनअभियान - टप्पा दुसरा कार्यान्वित करणे"** | परिशिष्ट क्रमांक (अ) आणि (ब) यातील अटी आणि शर्तीप्रमाणे सर्व जबाबदाऱ्या पार पाडणे | |

| | |
|---|
| **रुपयेः** |
| **अक्षरी रुपयेः** |

शिक्काः

दिनांकः स्वाक्षरीः

पूर्ण नाव व पत्ताः

Note: The Bidders are requested to rake the printout of the Financial Offer (परिशिष्ट and the amount manually in the same and upload the PDF copy in the space mention as the financial cover.